नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्र. नजोयो२०२३(२२९ /२०२३)/जसंअ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०५ सप्टेंबर, २०२४

संदर्भ :
१) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र.संकीर्ण-२०१४/(९६/१४)/जसं (आस्था), दि.२३.११.२०१६
२) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र संकिर्ण-२०१९/(७५/२०१९)/जसंअ दि.१९.०९.२०१९
३) अधीक्षक अभियंता तथा सदस्य सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-१ नाशिक यांचे पत्र क्र. राताससस-१/कक्ष-२/(मु)/नारपार गिरणा/(धा.क्र. ६७/२०१९)/७२३/२०२३ दि.१८.०८.२०२३
४) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव जा.क्र. कासं/तापाविम/प्रशा-२/३९४७/सन-२०२३ दि. २२.०८.२०२३
५) मा.राज्यपाल कार्यालयाचे पत्र क्र.RB/dB/e-१९०११(११४)(२०२४)/२३ दि. ०९.०८.२०२४.
६) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे पत्र क्र.MWRRA/2023/PRCL/TIDC/145/476 दि. १६.०८.२०२४

**प्रस्तावना :-**

नार पार गिरणा नदीजोड योजनेव्दारे नार, पार व औरंगा या तीन पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातुन १०.६४ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत नाशिक जिल्हयातील सुरगाणा तालुक्यातील विविध ठिकाणी ९ धरणे बांधुन, या धरणातुन पाणी उपसा करुन गिरणा उपखोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. या नदीजोड योजनेव्दारे नाशिक जिल्हयातील सुरगाणा, कळवण, देवळा व मालेगाव तालुक्यातील ३२४९२ हेक्टर व जळगाव जिल्हयातील भडगाव, एरंडोल, व चाळीसगाव १७०२४ हेक्टर असे एकुण ४९५१६ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

शासकीय खर्चाने मोठया उपसा सिंचन योजना हाती घेण्यासाठी शासन निर्णय दि. २३.११.२०१६ मधील तरतुदीनुसार मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर योजना हाती घेण्यास मान्यता दिली आहे.

या योजनेस मा.राज्यपाल महोदय यांची दि.०९.०८.२०२४ रोजी तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच, सदर प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र दि.१६.०८.२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने प्रस्तावाची छाननी करुन त्यातील मुद्दा क्र.२७ च्या अधिन राहुन प्रकल्पास शिफारस केली आहे. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी राज्य तांत्रिक सल्लागार समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन अहवालासह प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता. मा.मंत्रीमंडळाच्या दि.२५/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने काही कामांचा अंतर्भाव प्रशासकीय मान्यता प्रस्तावात करण्याचे निर्देश मा. मंत्रीमंडळाने दिले आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पास खालील अटींच्या अधीन राहून जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारित एकूण रु. ७४६५.२९ कोटी (रुपये सात हजार चारशे पासष्ट कोटी एकोणतीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आहे.

१. शासन निर्णय दि. २०.१२.२०२३ मधील तरतुदीनुसार सदरहू योजना उदंचन जलविद्युत प्रकल्प म्हणून राबविणे शक्य आहे किंवा कसे याची तपासणी महामंडळाने करावी.
२. सर्व वैधानिक मान्यता प्राप्त केल्याखेरीज प्रकल्पाचे बांधकाम हाती घेऊ नये.
३. आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.
४. सर्व तांत्रिक मान्यता सक्षम स्तरावर घेण्यात याव्यात.
५. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील सूचनांची पूर्तता झाल्याची खातरजमा करण्यात यावी.
६. प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रीय स्तरावरील निर्णयास मान्यता गृहित धरली जाणार नाही. सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करू नये.

प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदीचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये सोबत जोडला आहे.

सदर योजनेसाठीचा खर्च “४७००- मोठे पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, ८० सर्वसाधारण, १९० सार्वजनिक व इतर क्षेत्रातील गुंतवणुका, (०२) विविध पाटबंधारे विकास महामंडळांना भाग भांडवली अंशदान (०२)(०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (कार्यक्रम), ५४ गुंतवणूका (४७०० ०१११)" "या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६५/२०२४ अन्वये प्राप्त सहमतीने व वित्त विभागाच्या सहमतीने तसेच मा. मंत्रीमंडळाने दि. २५/०८/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२४०९०५१७३७१३८८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

JAYA PRAVIN POTDAR

Digitally signed by JAYA PRAVIN POTDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=a6bf66f95dd09d40d69a5737642a79f0e7da9d3150abc54cc7bad607088c7c18, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=45E2D63499928F8B69AB9E8EA3E7CBAB44D2E79B3CF5C253F37180C7E6DE4371, cn=JAYA PRAVIN POTDAR
Date: 2024.09.06 10:59:43 +05'30'

**(जया पोतदार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री, (जलसंपदा) यांचे प्रधान सचिव.
४. मा.उपमुख्यमंत्री ( वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव.
५. अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
८. महालेखापाल (लेखापरीक्षा/अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर.
९. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.सचिव (प्रस), जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१२.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
१३.मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक.
१४.आंतरवित्तीय सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५.जसंअ कार्यासन संग्रहार्थ.

**शासन निर्णय क्र. नजोयो-(२२९ /२०२३ )/जसंअ दिनांक :- ०५ सप्टेंबर, २०२४**

**सोबतचे परिशिष्ट**

**नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प**

**परिशिष्ट १**

प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदीचा गोषवारा

**(Cost in Cr)**

| Sr. No | Sub Head | Headworks | Canal & Distribution System | Total cost |
|---|---|---|---|---|
| 1 | A-Preliminary | 119.98 | 3.88 | **123.86** |
| 2 | B-Land | 704.36 | 0.05 | **704.41** |
| 3 | C-Works | **5353.76** | 0.00 | **5353.76** |
| 4 | D-Regulator | - | 0.38 | **0.38** |
| 5 | F- RHT Works | - | 3.45 | **3.45** |
| 6 | G-Bridges | 14.21 | 0.11 | **14.32** |
| 7 | K-Building | 6.31 | 1.96 | **8.27** |
| 8 | L-Earthwork | - | 59.44 | **59.44** |
| 9 | M-Plantation | 41.67 | 4.04 | **45.71** |
| 10 | O-Miscellaneous | 99.22 | 1.25 | **100.48** |
| 11 | P-Maintenanace | 49.61 | 0.63 | **50.24** |
| 12 | Q-Special T & P | 1.32 | 0.26 | **1.58** |
| 13 | R-Communication | 81.92 | 1.22 | **83.14** |
| 14 | U-Distributary | - | 216.72 | **216.72** |
| 15 | X-Environment | 1.35 | | **1.35** |
| 16 | **Sub Total** | 6473.72 | 293.39 | **6767.11** |
| 17 | Miscelleneous Cost (Direct and Indirect Charges) | 698.18 | | **698.18** |
| **Total** | | | | **7465.29** |

JAYA PRAVIN POTDAR

Digitally signed by JAYA PRAVIN POTDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=a6bf66f95dd09d40d69a5737642a79f0e7da9d3150abc54cc7bad607088c7c18, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=45E2D63499928F8B69AB9E8EA3E7CBAB44D2E79B3CF5C253F37180C7E6DE4371, cn=JAYA PRAVIN POTDAR
Date: 2024.09.06 11:00:00 +05'30'

(जया पोतदार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन